MHRG040060762025

<u>**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ३२/२०२६**</u>
श्रीमती. सुषमा रविंद्र लोंढे व इतर वि. निरंक
<u>**निशाणी क्र. १ वरील आदेश**</u>

१. सदरचा अर्ज हा बॉम्बे रेग्युलेशन १८२७ अंतर्गत वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबत दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराच्या म्हणण्याप्रमाणे मयत लक्ष्मी शुक्रनाथ सोनावणे या दिनांक १६.०५.२०१९ रोजी लोअर परेल, मुंबई येथे मृत्युपत्र न करता मरण पावले आहेत. अर्जदार क्रं. १ ते ३ या मयत लक्ष्मी शुक्रनाथ सोनावणे यांच्या मुली, अर्जदार क्र. ४ हा मुलगा व अर्जदार क्र. ५ हे पती आहेत. अर्जदार हे मयत लक्ष्मी शुक्रनाथ सोनावणे यांचे वारस आहेत. अर्जदार यांनी वारसदाखला मिळण्याकामी या न्यायालयाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही न्यायालयात अर्ज दाखल केलेला नाही. करीता सदर अर्ज वारसप्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केला आहे.

३. अर्जदार क्र २ यांनी नि.क्र. १० वर पुराव्याचे शपथपत्र दाखल करुन अर्जातील मजकुराची पुनरावृत्ती केली आहे. तसेच कागदपत्र म्हणुन मयत लक्ष्मी शुक्रनाथ सोनावणे यांचा मृत्यूदाखला प्रमाणित प्रत नि.क्र.१३, दिनांक २३.०४.२०१६ रोजीचे पवल५—३१६०—२०१६ करारनाम्याची प्रमाणित प्रत नि.क्र. १४, दिनांक २६.०९.२००० रोजीचे अलॉटमेंट लेटरची प्रमाणित प्रत नि.क्र.१५, दिनांक २६.०१.२००२ रोजीचे शेअर सर्टीफिकेटची प्रमाणित प्रत नि.क्र.१६, दिनांक २२.०३.२००२ रोजीचे लिज ॲग्रीमेंटची झेरॉक्स प्रत नि.क्र.१७, अर्जदार यांच्या आधार कार्डच्या प्रमाणित प्रती नि.क्र.१८, अर्जदार यांचे रेशनकार्डची प्रमाणित प्रत नि.क्र.१९, पुरावा बंद पुरशीस नि.क्र.२१ वर दाखल केले आहे.

४. अर्जासंदर्भात नि.क्र. ७ व ८ प्रमाणे जाहीरनामा व नि.क्र.२०

वरील 'दैनिक जनखुलासा' वर्तमानपत्रातील दिनांक २९.०१.२०२६ रोजी जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात आली. मात्र कोणत्याही ति—हाईत इसमाची याकामी हरकत प्राप्त झाली नाही.

५. दाखल केलेल्या पुराव्याचे अवलोकन केले असता मयत लक्ष्मी शुक्रनाथ सोनावणे या दिनांक १६.०५.२०१९ रोजी मयत झालेल्या आहेत. अर्जदार क्र. १ ते ३ हया मयत लक्ष्मी शुक्रनाथ सोनावणे यांच्या मुली आहेत व अर्जदार क्र. ४ हा मयत लक्ष्मी शुक्रनाथ सोनावणे यांचा मुलगा आहे व अर्जदार क्र. ५ हे मयत लक्ष्मी शुक्रनाथ सोनावणे यांचे पती आहेत. करिता अर्जदार हे मयत लक्ष्मी शुक्रनाथ सोनावणे यांचे कायदेशीर वारस आहे. नि.क्र. ७ व ८ वरील जाहीरनामा व नि.क्र.२० वरील जाहीर नोटीस प्रसिध्द होउन देखील इतर कोणत्याही ति—हाईत इसमांनी याकामी हजर राहुन कोणतीही हरकत घेतलेली नाही. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. अर्जदार हे **मयत लक्ष्मी शुक्रनाथ सोनावणे** यांचे कायदेशीर वारस आहेत असा दाखला आवश्यक त्या मुद्रांकशुल्क यावर देणेत यावा.

RAJSHRI MANOHAR GANVIR

Digitally signed by RAJSHRI MANOHAR GANVIR
Date: 2026.03.13 12:55:31 +0530

पनवेल

**दि.१२.०३.२०२६**

(राजश्री म. गणवीर)

**३रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर,**
**पनवेल**